दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
www.raigadnagari.com
/ raigadnagari
वर्ष २० वे | अंक १४९ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शनिवार, दि.१६ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित



# पनवेल महापालिका मुख्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारताच्या ७९व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्यावतीने छत्रपती संभाजीराजे मैदानावर आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमास आमदार विक्रांत पाटील, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे,परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, मंगला माळवे, स्वरूप खारगे, सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.भगवान गीते, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, माजी नगरसेवक , विविध पक्षाचे पदाधिकारी , महापालिकेचे अधिकारी आणि सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या वेळी रायगड सुरक्षा रक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य सुरक्षा बल आणि महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी संचलन करत ध्वजाला मानवंदना दिली.

यावेळी वाहन विभागाच्या ड्रायव्हर केबीनचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याचबरोबर पनवेल महानगरपालिकेच्या १० शाळांमध्येही ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी महापालिकेचे शिक्षक, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंगदान जीवन संजीवनी अभियानांतर्गत अवयव दानासाठी नोंदणी केलेल्या दात्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



> यावेळी नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकने तयार केलेल्या 'कर-मित्र' चॅटबॉट चे लोकार्पण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# मालमत्ता करावरील शास्ती माफीला मुदत वाढ द्या : आ.प्रशांत ठाकूर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेतर्फे राबविण्यात आलेल्या मालमत्ता करावरील शास्ती माफी योजनेअंतर्गत देण्यात आलेली मुदत ३० (तीस) दिवसांनी वाढविण्यात यावी अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, पनवेल महानगरपालिकेने शासनाच्या तसेच लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या मागणीचा विचार करून मालमत्ता करावरील शास्ती माफीचा निर्णय घेतला. हा निर्णय नागरिकांना दिलासा देणारा ठरला आहे. तथापि निर्णयानंतर काही व्यक्तींमार्फत चुकीचा व खोटा प्रचार तसेच संभ्रम निर्माण करणारी विधाने करण्यात आली ज्यामुळे अनेक नागरिकांची दिशाभूल झाली आहे. परिणामी अनेक नागरिक मालमत्ता कर भरण्याच्या देण्यात आलेल्या मुदतीचा लाभ घेऊ शकले नाहीत. त्यामुळे हि परिस्थिती लक्षात घेता शास्ती माफीची सद्य मुदत वाढविण्यात आल्यास उर्वरित नागरिकांनाही या योजनेचा लाभ घेता येईल व महसूल वसुलीच्या दृष्टीनेही हा निर्णय हितकारक ठरेल. त्यामुळे सदर शास्ती माफीबाबत देण्यात आलेली मुदत ३० दिवस वाढविण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिकेकडे केली आहे.

> पनवेल महापालिका क्षेत्रातील मालमत्ता करावरील लावलेली शास्ती तातडीने अभय योजना लागू करुन रद्द करावी यासाठी भाजपच्यावतीने महानगरपालिकेत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने मालमत्ता करावरील शास्ती माफीची अभय योजना लागू करण्यात आली. याचा अनेक मालमत्ता धारकांनी लाभ घेतला. या काळात जवळपास २०० कोटीहुन अधिक रुपये कर भरून या योजनेचा लाभ मालमत्ता धारकांनी घेत उदंड प्रतिसाद दिला आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात...

# जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते ध्वजारोहण उत्साहात संपन्न



**दै.रायगड नगरी । रायगड**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनाच्या ७८ व्या वर्धापनदिनी ध्वजारोहण जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी डॉ रविंद्र शेळके, श्रीकांत गायकवाड, रविंद्र राठोड जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सुर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, तहसिलदार विक्रम पाटील यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### स्वातंत्र्य दिनानिमित्त अलिबाग येथे कु.तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

# नागरिकांच्या सक्रिय सहभागातून रायगड जिल्हा विकासाचे नियोजन : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । रायगड**

नागरिकांच्या आशा-आकांक्षांचा विचार करून विकासप्रक्रियेत त्यांचा सक्रिय सहभाग, दूरदृष्टी ठेवून योग्य नियोजन, जगातील अत्याधुनिक संकल्पना तंत्रज्ञानाचा वापर, उत्पन्नाच्या स्रोतात वाढ आणि विकास प्रकल्पांच्या गतीने पूर्णत्वासाठीचा पाठपुरावा या माध्यमातून भविष्यातील 'विकसित रायगड जिल्हा साकारला जाईल यासाठी आपण सर्वजण एकत्रितपणे प्रयत्न करु या असे प्रतिपादन महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांनी आज येथे केले.

भारतीय स्वातंत्र्याच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्ताने महिला व बालविकास मंत्री कु.आदिती वरदा सुनिल तटकरे यांच्या हस्ते अलिबाग येथील पोलीस परेड मैदानात ध्वजारोहण झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा पोलीस अधिक्षक आचल दलाल,उप वनसंरक्षक राहुल पाटील अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अपर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, , जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.निशिकांत पाटील, कार्यकारी अभियंता, सां.बा.अलिबाग श्रीमती मिनाक्षी धायतडक, जिल्हा नियोजन अधिकारी उमेश सुर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी सर्जेराव सोनावणे, जिल्हा माहिती अधिकारी श्रीमती मनिषा पिंगळे यांच्यासह जिल्हा प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



कु.आदिती तटकरे यांनी भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त जिल्ह्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच देशासाठी आपले प्राण अर्पण केलेल्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्यवीर, शहीद यांना वंदन केले.

महिला व बालविकास मंत्री कु.तटकरे म्हणाल्या की, महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास या एकमेव अजेंड्यावर राज्य शासन काम करत आहे. राज्याला देशातच नव्हे, तर जागतिक स्तरावर नेण्यासाठी आम्ही आगामी पाच वर्षांसाठी एक ठोस आणि सर्वसमावेशक व्हिजन निश्चित केले आहे. आज आपण ज्या संधी आणि आव्हानांसमोर उभे आहोत, त्यावर मात करत एक स्थिर, समृद्ध, आणि लोकाभिमुख महाराष्ट्र घडवण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. विकासाच्या बाबतीत जागतिक पातळीवरीत संकल्पना आता बदलत चालल्या आहेत, निव्वळ आर्थिक विकास म्हणजे विकास नव्हे, तर बदललेल्या संकल्पनेत आर्थिक विकास, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्याच्या सोयीसुविधा, रोजगार निर्मिती, ग्रामीण रस्ते, महामार्ग, रेल्वे मार्ग, मेट्रो, विमानतळ, जलमार्ग यांसारख्या सुविधांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी दिला जाणारा निधी हा केवळ खर्च नसून ती भविष्यासाठी केलेली गुंतवणूक बनली आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते

# कोंकण भवन येथे ध्वजारोहण संपन्न

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७९ वा वर्धापन दिन आज कोंकण भवन येथे उत्साहात साजरा झाला. यावेळी कोंकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते कोंकण भवन प्रांगणात सकाळी ०९.०५ वाजता ध्वजारोहण संपन्न झाले.

या कार्यक्रमास नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, कोंकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, नवी मुंबई पोलीस सहआयुक्त संजय ऐनपुरे, नवी मुंबई पोलीस अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे) दिपक साकोरे, अपर आयुक्त कोकण विभाग विकास पानसरे, अपर आयुक्त (महसूल) श्रीमती वैशाली इंदानी-उंटवाल, अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) श्रीमती फरोग मुकादम, अपर आयुक्त (करमणूक) रविंद्र पवार, अपर आयुक्त (विकास आस्थापना) मिनल कुटे, उपायुक्त (नियोजन) प्रमोद केंभवी, सह आयुक्त(पुनर्वसन) रवि पाटील, अपर आयुक्त (विकास) माणिक दिवे, सह आयुक्त (रोहयो) डॉ.श्रीमंत हारकर,



पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, माजी सैनिक, शासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त कोकण भवन इमारतीच्या प्रांगणात हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत शुभेच्छा संदेश फलक लावून वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी कोकण भवन इमारत तिरंगी रंगाच्या रोषणाईने सजवण्यात आली होती.

पोलीस सेवेत उत्कृष्ट कार्य करणारे सीबीडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस आयुक्त मयुर भुजबळ, गुन्हे शाखा सहायक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे, नेरुळ पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक मयुर पवार, वाशी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक वैभव रुपवते, कळंबोली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अभय काळे या विशेष सेवापदक प्राप्त पोलीस अधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.



# मांसाहाराचे स्वातंत्र्य

राज्यातल्या पाच महापालिकांनी स्वातंत्र्यदिनी आपापल्या शहरातील कत्तलखाने बंद ठेवण्याचे व मांसाहार विक्री न करण्याचे आदेश जारी केले आहेत. कल्याण-डोंबिवली, मालेगाव, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती या महापालिकांचा यात समावेश आहे. एक प्रकारे मांसाहार करणाऱ्यांचे खाद्यस्वातंत्र्य स्वातंत्र्यदिनी हिरावून घेतले आहे. यामागील कारण काय, या प्रश्नाचे थेट उत्तर देण्याऐवजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, कोणी काय खावे, यामध्ये सरकारला पडायचे नसल्याचे म्हणताना, काँग्रेसने १९८८मध्ये काढलेल्या आदेशाच्या आधारे हा निर्णय असल्याचे सांगून टाकले आहे. मुळात काँग्रेसच्या घोडचुकांमुळेच जनतेने यांना निवडून दिलेले असताना अशी कारणे सध्याचे सरकार किती काळ देत राहणार? विविध धर्म, जाती, पंथ, भाषांनी सजलेली भारतीय खाद्य संस्कृती ही मोजक्याच प्राचीन खाद्य संस्कृतींपैकी एक आहे. भारतीय उपखंडात प्राचीन काळापासून जगभरातून असंख्य लोक त्यांचे सांस्कृतिक संचित घेऊन आले व इथलेच झाले. त्यामुळे भारतीय मांसाहारी व शाकाहारी खाद्य संस्कृती अत्यंत प्रगत व सुदृढ झाली. दर पाच मैलांवर मसाले व फोडण्यांची पद्धत बदलणाऱ्या या देशात बहुतांश जनता ही शाकाहारी असल्याचा गैरसमज मात्र गेल्या काही वर्षांपासून अत्यंत वेगाने पसरवला गेला आहे. वास्तविक पाहता भारतातील मांसाहाराचा लिखित इतिहासच वेदकालीन आहे, हे डी. एन. झा यांच्यासारख्या थोर इतिहासकाराने दाखले देऊन समोर आणले आहे. मांसाहाराचे हे दाखले वेदांपासून ते रामायण- महाभारतासारख्या विश्वविख्यात महाकाव्यांमध्येही सापडतात. चरक व सुश्रुत संहितांमध्येही मांसाहाराचे फायदे सांगितले आहेत. झा यांच्या वैचारिकतेशी अनेकांचे मतभेद असल्याने या नावाला अनेक जण नाके मुरडतीलही; मात्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेला मानणारे व त्या परिवाराचा सदस्य असणारे थोर कन्नड लेखक एस. एल. भैरप्पा यांच्या गाजलेल्या 'पर्व' या कादंबरीत महाभारतातील एकूण एक पात्रे मांसाहार करत असल्याचे दाखवले आहे. मानवशास्त्राच्या अनुषंगाने लिहिलेल्या या थोर कादंबरीवर बंदी आणावी, अशी मागणी आक्रमकपणे मांसाहारविरोधी भूमिका घेणाऱ्या कुठल्याही महाभागाने अद्याप केलेली नाही, हे सुदैवच. प्राचीन काळापासून मांसाहारी असलेल्या भारतातील शाकाहाराचे मूळ हे बौद्ध व महावीरांचे तत्त्वज्ञान आहे. आज १५ ऑगस्टच्या निमित्ताने जशी मांसाहारावर बंदी घालण्यात आली आहे, तशाच प्रकारची सरसकट बंदी सम्राट अशोकानेही बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर घालण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, भारतीय खाद्य संस्कृतीने तयार झालेल्या जिव्हालौल्यापुढे त्याचाही टिकाव लागला नव्हता. भारतीय संस्कृतीचे साचेबद्ध अन्वयार्थ काढून, आपल्याला वाटते तीच खरी संस्कृती असे मनाशी ठरवणाऱ्या व्यक्ती असे तुघलकी निर्णय घेतात. यावर विरोधी सूर थोडा मोठ्याने आळवण्यास सुरुवात झाल्यावर, आम्ही मांसाहारावर बंदी घातलेली नसून कत्तलखाने व मांसविक्री दुकाने बंद ठेवण्यास सांगितले असल्याचा अजब खुलासा प्रशासनाने केला आहे; पण ज्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पावलावर पाऊल ठेवून आम्ही राज्यकारभार करतो आहोत, असे प्रत्येक कार्यक्रमात आजचे राज्यकर्ते सांगतात, त्यांनी सावरकरांचे मांसाहाराविषयीचे विचार वाचले तरी असला आततायीपणा थांबेल. वास्तविक, असले जुने आदेश रद्द करण्याचा मार्ग काढणे सरकारला शक्य होते; पण हे निर्णय कोणी घ्यायचे, त्याने कोणती मतपेढी दुखावेल का, या विचारांना प्राधान्य दिले जात असावे. मुंबई - पुण्यासारख्या शहरांमध्ये मोठमोठ्या सोसायट्यांमध्ये मासांहार करणाऱ्यांना सदनिका न देण्याच्या बातम्या येत असतात. त्याही विरोधात सरकार थेट भूमिका घेत नाही. शाकाहार करणाऱ्यांचा आदर केला जावा, हे योग्य असले तरीही मांसाहार करणाऱ्यांचा सरसकट अनादरही योग्य नाही. मुळात नागरिकांनी काय खावे, यात आपण पडण्याचीच गरज नाही, याची स्पष्ट जाणीव सरकार व प्रशासनानेही करून घ्यायला हवी. काही धार्मिक सणांच्या वेळी विशिष्ट समाजाच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत म्हणून अशा प्रकारचे आदेश काढणे योग्य असले, तरीही स्वातंत्र्यदिन हा कोणाच्या भावना दुखावण्याचा दिवस नाही, याचे भान राज्यकर्त्यांना येईल तो सुदिन.

# मध्यरात्रीच्या ध्वजारोहणास कर्जतकरांचा उदंड प्रतिसाद



**दै.रायगड नगरी । कर्जत**

स्वातंत्र्य दिनी कर्जत तालुका मराठी पत्रकार संघ आणि कर्जत प्रेस क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मध्यरात्रीच्या ध्वजारोहण समारंभास कर्जतकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उदंड प्रतिसाद दिला. मध्यरात्रीच्या ध्वजारोहणाचे हे एकविसावे वर्ष आहे.

कर्जतच्या स्वर्गीय भाऊसाहेब राऊत चौकात १४ ऑगष्ट रोजी मध्यरात्री ध्वजारोहणाचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष ड. राहुल देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. चौकाच्या नामफलकाला जे. एम. मिर्झा या ९६ वर्षीय जेष्ठ नागरिकांनी पुष्पहार अर्पण केला. निवृत्त सैनिक विनायक उपाध्ये यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले. त्यानंतर बरोबर बारा वाजून पाच मिनिटांनी अंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटपटू कु. वंशिका संजय मोहिते हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी रायगड प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष संजय मोहिते, कर्जत तालुका मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष विजय मांडे, वैदेही पुरोहित, प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष विलास श्रीखंडे, ज्ञानेश्वर बागडे, रमाकांत जाधव, प्रभाकर गंगावणे आदी उपस्थित होते. त्यानंतर पुरोहित यांच्या हस्ते वंशिकाचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, रजनी गायकवाड, माजी नगरसेवक सुनील गोगटे, मधुरा चंदन, नितीन परमार, राजाभाऊ कोठारी, दिलीप गडकरी, पांडुरंग गरवारे, मुफद्दल डाभिया, महेंद्र चंदन, वसंत ठाकूर, ज्ञानेश्वर वाडीले, असीफ मिर्झा, वसंत मोधळे, कल्पेश शहा, संदीप पारकर, मंदार दगडे, मिलिंद खंडागळे, शैलेश सातपुते, कौशिक वांजळे, अमीर माणियार, नवाज तांबोळी, संदीप करणूक आदिं सह देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोसरी येथील शिवतीर्थ येथे पोलीस निरीक्षक संदीप भोसले, गीता घारे इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये संस्थेचे अध्यक्ष सुधाकर घारे, नगरपरिषदे मध्ये मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, प्रशासकीय भवन मध्ये उपविभागीय प्रकाश संकपाळ, पंचायत समिती मध्ये गट विकास अधिकारी सुशांत पाटील, कोंकण ज्ञानपीठ कर्जत महाविद्यालयात प्राचार्य डॉ. रामचंद्र गायकवाड, अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. विलास पिल्लेवान, फार्मसी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. मोहन काळे, इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये श्रीकांत मनोरे, स्वातंत्र्यवीर दत्तात्रेय डोंबे विद्या निकेतनमध्ये कु. गौरी देशमुख, माजी आमदार तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान संस्थेत खजिनदार विजय मांडे, कोंडीवडे ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच प्रमोद देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये मुख्याध्यापक तसेच ग्रामपंचायतींमध्ये सरपंच, प्रशासक यांनी ध्वजारोहण केले. या विविध ठिकाणी झालेल्या ध्वजारोहण प्रसंगी आमदार महेंद्र थोरवे, तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, जिल्हाप्रमुख संतोष भोईर, माजी नगराध्यक्ष शरद लाड, वनिता म्हसे, माजी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, माजी नगरसेवक प्रवीण गांगल, सई वारे, संकेत भासे, उमेश गायकवाड, सोमनाथ ठोंबरे, बळवंत घुमरे, नदीम खान, प्रभाकर करंजकर, रमेश खैरे, गुरुनाथ दाभाडे, यशवंत पवार, संजय परदेशी, अभिषेक सुर्वे, विश्वनाथ थोरवे, दिनेश कडू, ज्ञानेश्वर जाधव, डॉ. अतुल त्रिपाठी, प्रा. अनिकेत इंदुलकर, निकेत मंडावळे, रुपेश पाटील, विजय जिनगरे, संजय खडे, आदी उपस्थित होते.

# खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीमध्ये अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिमेअंतर्गत आज दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीमध्ये विविध प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .सदर कार्यक्रमात वपोनि स्मिता ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमा दरम्यान अधिकाऱ्यांनी अमली पदार्थाचे दुष्परिणाम याबाबत जनतेला माहिती देऊन जनजागृती केली.

या अंतर्गत येथील सी के टी कॉलेज खांदा कॉलनी ते खांदेश्वर पोलीस ठाणे येथे मानवी साखळी व पायी रॅली यात ११० विद्यार्थी शिक्षक व पो. अधिकारी व अंमलदार यांचा सहभाग होता . त्यानंतर खांदेश्वर पोलीस ठाणे येथील सायकल रॅली यात रोटरी क्लब सहभाग होता . त्यानंतर रायन स्कूल सेक्टर ११ येथे जनजागृती अभियान राबविण्यात आले तसेच एनएमएमटी बस डेपो आसुडगाव येथे जनजागृती अभियान त्याच प्रमाणे सेंट जोसेफ स्कूल, सेक्टर-७, नवीन पनवेल येथे जनजागृती अभियान तर पनवेल रेल्वे स्टेशन येथे जनजागृती अभियान तसेच आदई ग्रामपंचायत येथे ,बालाजी स्प्लेंडर फेज २, आदई येथे अष्टविनायक गृह संकुल फेज २ सोसा. आदई येथे सन बेन सोसायटी आसुडगाव ,पुष्प विनायक कॉम्प्लेक्स आदई गाव येथे सुद्धा अमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिम राबविण्यात आली. याला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी यावेळी दिली.

# पनवेल तालुका पोलीस ठाणे तर्फे दहीहंडी व गणेश उत्सव उत्सव मंडळ पदाधिकारी बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलीस ठाणे तर्फे येथे आगामी दहीहंडी व गणेश उत्सव निमीत्ताने पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी यांची बैठक सहा. पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आली, यावेळी विविध सूचना देण्यात आल्या.



सदर बैठकीमध्ये पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी विविध सूचना केल्या . त्यामध्ये कार्यक्रम ठिकाणी सीसीटीव्ही लावणे व स्वयंसेवक यांची नेमणूक करावी. संबंधीत सर्व आस्थापनाची परवानगी विहीत वेळेत प्राप्त करणे, उत्सवा दरम्यान वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, तसेच इतर नागरीकांना त्रास होणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घेणे, सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना प्रथमोउपचार पेटी, डॉक्टरांची टीम, म्बुलन्स इत्यादी सोय करणे, कार्यक्रमावेळी कोणत्याही जाती-धर्माच्या धार्मीक भावना दुखावल्या जातील असे बॅनर/ पोस्टर, आक्षेपार्ह गाणे, पोवडा, वाद्य, संगीत लावू नये, तसेच आक्षेपार्ह भाष्य करू नये, ध्वनीप्रदूषण संदर्भात मा. न्यायालय यांनी दिलेल्या सुचनांचे उल्लंघन होणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात यावी. डीजे/ डॉल्बी लावण्यास मनाई आहे. सार्वजनिक मंडळांनी उत्सव ठिकाणे पार्किंगची व्यवस्था करावी.

गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक बाबत मार्गदर्शन केले. दहीहंडी उत्सवानिमित्त भेट देणाऱ्या सलामी पथकाची नोंद रजिस्ट्री ठेवावे. तसेच १४ वर्षा खा- लील मुले /मुली हे दहीहंडी फोडणार नाही यांची खबरदारी घ्यावी. असे आवाहन त्यांनी केले आहे . या बैठकीला वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# भारतीय स्वातंत्र्यदिनाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७९ वा वर्धापन दिनानिमित्त आज तहसील कार्यालयाच्या परिसरात तहसीलदार स्वाती पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ पार पडला. त्यावेळी तहसीलदार स्वाती पाटील यांनी उपस्थितांना भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या



यावेळी नायब तहसीलदार श्री.पालांडे, नायब तहसीलदार श्री.पाटील, निवडणूक नायब तहसीलदार श्री.टेंबे, सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री.गवई, मुख्याधिकारी मनिषा वजाळे, गटविकास अधिकारी महादेव शिंदे, नगराध्यक्षा माधुरी घोलप, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे, शेतकरी संघटना सचिव कैलास पायगुडे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष नाना भौड, शिवसेना शहर प्रमुख राकेश वडके, भाजपा तालुका अध्यक्ष रितेश मुंढे प्रतिष्ठित नागरिक, शासकीय अधिकारी, पत्रकार, विद्यार्थी, आणि तळेवासी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी तहसीलदार स्वाती पाटील यांनी देशसेवेसाठी प्राणांची आहुती दिलेल्या सर्व हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करुन स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी व सर्व उपस्थित मान्यवरांची भेट घेऊन स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून हर घर तिरंगा अभियानाची आणि तंबाखू विरोधी जनजागृती व तंबाखू विरोधी शपथ तहसीलदार स्वाती पाटील यांनी उपस्थित पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक, पत्रकार, तळेवासी यांना दिली.

महसुली विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयात उत्कृष्ट काम करणाऱ्या व नवनवीन संकल्पना राबविणाऱ्या उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी यांना यावेळी गौरविण्यात आले. त्यात तळा तहसीलदारांचाही गौरव केला गेला शिर्के गुरुजी यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले.

तसेच महसूल विभागात उत्कृष्ट प्रशासकीय सेवेबद्दल तलाठी श्री.वाघमारे यांना माजि राजिप सदस्य मंगेश देशमुख यांच्या हस्ते गौरविण्यात आले तसेच महसूल कर्मचारी रवींद्र बावदणे यांची पदोन्नती झाल्या बद्दल त्यांचा गौरव शेतकरी संघटनेचे सचिव कैलास पायगुडे यांच्या हस्ते करण्यात आला.

# नांदगाव सरपंचांची याचिका सुप्रीम कोर्टानेही फेटाळली

**दै.रायगड नगरी । माणगाव**

सुधागड तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्वाची समजली जात असलेल्या नांदगाव ग्रामपंचायतीचे अपात्र सरपंच आशिष सावंत यांनी अवैध जातप्रमाणपत्र प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालावर दाखल केलेली याचिका अखेर सुप्रीम कोर्टानेही फेटाळल्याने त्यांना चांगलाच दणका बसल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे कि, नोव्हेंबर २०२३ मध्ये पार पडलेल्या सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूकीत नांदगाव ग्रामपंचायत सरपंच पदावर आशिष बाळाजी सावंत नागरिकांचा मागास प्रवर्गामधून थेट निवडून आले होते. परंतु सरपंचपदासाठी नामनिर्देशन पत्र सादर करताना , सावंत यांनी स्वतःचा कुणबी जातीचा दाखला जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अलिबाग यांचेकडे जोडला होता.

सरपंच आशिष सावंत यांच्या कुणबी जातीच्या दाखला खोटा आणि बनावट असल्याबाबत नांदगाव येथील जालिंदर तुकाराम खैरे यांनी तीव्र आक्षेप घेत पडताळणी समितीकडे हरकत घेतली होती. यावर सुनावणी होऊन, आशिष सावंत यांनी स्वतःच्या कुणबी जातीचा सक्षम पुरावा म्हणून सादर केलेले चुलतबहीण ज्योती गणपत सावंत हिचे जात वैधता प्रमाणपत्र तसेच इतर पुरावे मानीव दिनांकापूर्वीचे नसल्याचे स्पष्ट झाले.

तसेच गाव नमुना चौदा मधील नोंदी संशयास्पद असल्याच्या अहवालानुसार आशिष सावंत यांचा कुणबी जातीचा दावा पडताळणी समितीने फेटाळला होता. यानंतर तक्रारदार जालिंदर खैरे यांच्या अर्जानुसार, जिल्हाधिकारी रायगड यांनीही आशिष सावंत यांना अवैध जात प्रमाणपत्र प्रकरणाचा ठपका ठेवून, नांदगाव ग्रामपंचायत सरपंच आणि सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरवले होते.

जिल्हाधिकारी रायगड यांनी दिलेल्या अपात्रतेच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करत , आशिष सावंत यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समिती , जालिंदर खैरे , जिल्हाधिकारी रायगड आणि उपविभागीय अधिकारी माणगाव यांचेविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर सुनावणी होऊन, आशिष सावंत यांनी खोट्या जातप्रमाणपत्राचा गैरफायदा घेतलेला असून हे कृत्य असंविधानिक असल्याचे उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवले. तसेच त्यांची याचिका फेटाळून, सैनिक कल्याण निधीमध्ये पाच लाख रूपये आशिष सावंत यांनी जमा करण्याची सूचना देऊन २० जून २०२५ रोजी दावा निकाली काढणेत आला .

उच्च न्यायालयाने दिलेल्या धक्कादायक निकालानंतरही आशिष सावंत यांनी अखेरचा पर्याय म्हणून थेट सुप्रीम कोर्टात धाव घेतली. परंतु उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालावर ठाम राहत , कोणताही हस्तक्षेप न करण्याचे नमूद करून सुप्रीम कोर्टानेही आशिष सावंत यांची अवैध जात प्रमाणपत्र प्रकरणाची याचिका फेटाळून लावल्याने त्यांच्यावर मोठी नामुष्की ओढवल्याचे दिसून येत आहे.तसेच याप्रकरणी तक्रारदार जालिंदर तुकाराम खैरे यांच्या सततच्या चिकाटीपूर्वक पाठपुराव्यामुळे , खोटे जातप्रमाणपत्र सादर करून निवडणूक आयोगाची व जनतेची दिशाभूल करून सरपंचपद भूषवणार्या नांदगावचे अपात्र सरपंच आशिष सावंत आणि त्यांचे राजकीय नेतृत्व यांना मोठा धक्का बसल्याची चर्चा सुधागड तालुक्यात सर्वत्र सुरू आहे.

# पनवेल परिसरात झालेल्या दोन अपघातात दोघेजण जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात झालेल्या दोन अपघातात दोघेजण जखमी झाल्याची घटना घडली आहे .

पनवेल येथे कंटेनरने धडक दिल्याने टेम्पोचालक आत्माराम फुलतावरकर हे जखमी झाले. अपघातात आत्माराम यांना पायाला गंभीर दुखापत झाली असून सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात कंटेनरचालकावर गुन्हा दाखल केला आहे. तर दुसऱ्या अपघातात पनवेल येथील नवीन पुलावर एर्टिगाकारने एक दुचाकीला धडक दिल्याने ५३ वर्षीय सीएम वासुदेवन जखमी झाले. ते नेरूळहून उलवे येथे दुचाकीवर कामासाठी जात होते. या अपघातात त्यांचा डावा खांदा फॅक्चर झाला असून, त्यांना नेरूळ येथील रुग्णालयात दाखल केले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांत गुन्हा दाखल आहे.

श्री सद्गुरू फायनान्शियल सर्व्हिसेस

(आमच्याकडे खालील कर्ज सुविधा उपलब्ध)

✻ गृहकर्ज ✻ व्यावसायिक कर्ज ✻ महिलांसाठी लघु उद्योग

✻ जागा खरेदीसाठी ✻ घर बांधणीसाठी ✻ लघु प्रकल्पासाठी

संपर्क - ७२१९३००७०९

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# ‘तिरंगा महोत्सव’ पनवेल महानगरपालिकेचा स्तुत्य उपक्रम : आ. प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रत्येक भारतीयाच्या घराघरात आणि मनामनात तिरंगा म्हणजेच आपले राष्ट्रप्रेम असायलाच पाहिजे, असे प्रतिपादन आमदार विक्रांत पाटील यांनी केले तर तिरंगा महोत्सव’ हा पनवेल महानगरपालिकेचा महत्त्वपूर्ण असा स्तुत्य उपक्रम असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

पनवेल महानगरपालिकेमार्फत आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी आयोजित तिरंगा महोत्सवाच्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून आमदारद्वय बोलत होते. यावेळी पनवेल परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, तसेच महानगरपालिकेचे सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



पुढे मार्गदर्शन करताना आ.श्री.पाटील म्हणाले, युवा वर्गाने अधिक पुढाकार घेऊन घरोघरी तिरंगा- हर घर तिरंगा सारख्या मोहिमेत सहभागी व्हावे. आपला देश,आपले राष्ट्र अधिक भक्कम बनविण्याची जबाबदारी युवा वर्गावर आहे. ऑपरेशन सिंदूर च्या पार्श्वभूमीवर या वर्षीच्या स्वातंत्र्य दिनाला एक आगळे वेगळे महत्त्व आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जी यांच्या संकल्पनेतून साकारलेली हर घर तिरंगा ही मोहीम सर्वत्र पोहोचवावी असेही त्यांनी यावेळी सांगितले.

घरो घरी तिरंगा- हर घर तिरंगा ही आता शासकीय मोहीम न राहता भव्य लोक चळवळ झाली आहे.यात पनवेल महानगरपालिकेने तिरंगा महोत्सव आयोजीत करून विविध उपक्रम सर्वत्र राबविले. तिरंगा महोत्सव हा पनवेल महानगरपालिकेचा एक स्तुत्य उपक्रम आहे. असे सांगून विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी तिरंगा महोत्सव स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.

महानगरपालिकेचे वतीने यावेळी फाळणी दु:खत दिनाचे छायाचित्र प्रदर्शन, तिरंगा राष्ट्रध्वज माहितीचे प्रदर्शन, भव्य तिरंगा रांगोळी, तिरंगा सेल्फी बूथ, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा देशभक्तीपर गीतांचा भारत गौरव गाथा सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

देशासाठी बलिदान स्वीकारलेल्या स्वातंत्र्यसेनानींच्या १२ वारसदारांचा सन्मान सत्कार आमदार महोदयांच्या हस्ते करण्यात आला. तसेच पनवेल अग्निशमन दलाच्या फायरमन शुभांगी घुले यांनी अमेरिकेत जागतिक स्पर्धेत सिल्वर आणि ब्रांझ मेडल मिळवून पनवेल मनपाचे आणि देशाचे नाव जागतिक पातळीवर नेले, त्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी महानगरपालिकेतर्फे राबवण्यात आलेल्या सर्व उपक्रमांची माहिती दिली. त्यांच्या व उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या हस्ते कार्यक्रमाच्या प्रारंभी आमदार महोदयांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांना प्रातिनिधिक स्वरूपात तिरंगा ध्वज देण्यात आला.

या कार्यक्रमास महापालिकेचे उपायुक्त सर्वश्री प्रसेनजीत कारलेकर, मंगला माळवे, स्वरूप खारगे, अभिषेक पराडकर,मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी डॉ. व्होरकाटे, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोस-ावी, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले तर आभार प्रदर्शन नगररचना विभागाच्या अंकिता नेरकर यांनी केले. साहिल रेळेकर यांच्या संगीत संयोजनात संपन्न झालेल्या भारताची गौरवगाथा - देश प्रेमाच्या स्वर लहरी या सांस्कृतिक कार्यक्रमाने अधिक रंगत आणली.

# पनवेलमधील हुतात्मा स्मारक उद्यानात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमधील हुतात्मा स्मारक येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात स्वातंत्र्यसैनिकांचे उत्तराधिकारी श्रीमती ताराबाई बबन धरणे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

या वेळी महानगरपालिकेचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, उपविभागीय अधिकारी पवन चांडक, तह-सीलदार विजय पाटील, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेविका उपस्थित होते.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, आपला देश समृद्ध व शक्तिशाली बनण्याकडे वाटचाल करताना स्वातंत्र्यसैनिकांच्या परिवाराने केलेल्या त्यागाचे विस्मरण होऊ नये यासाठी याठिकाणी स्वातंत्र्य सैनिकांच्या उत्तराधिकारी हस्ते ध्वजारोहण केले जात आहे.

स्वातंत्र्य सैनिकांनी केलेला त्याग आम्हाला कायमच प्रेरणा देत राहील असे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदार विक्रांत पाटील म्हणाले , देशप्रेम व्यक्त करण्यासाठी विशेष काही करावे लागत नाही, मी समाजाचे देणे लागतो या भावनेतून समाजपयोगी काम झोकून केले पाहिजे.देशप्रेमाची यापेक्षा मोठी व्याख्या नाही.असे त्यांनी सांगितले. यावेळी पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन व सुरक्षा विभागामार्फत तसेच पोलीस दलामार्फत ध्वजास मानवंदना देण्यात आली.

तसेच यावेळी उपायुक्त सर्वश्री डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, मंगला माळवे, स्वरूप खारगे, सहायक, सुबोध ठाणेकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी व स्वातंत्र्य सैनिकांचे उत्तराधिकारी , नागरिक उपस्थित होते.





७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेल तालुका व शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने ध्वजारोहण व ध्वजवंदन समारंभ मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्या अनुषंगाने भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, राजेंद्र पाटील, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, महिला मोर्चाच्या अध्यक्षा रुचिता लोंढे, यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सिडकोमध्ये हिरकणी कक्ष – मातृत्व आणि सक्षमीकरणाचा संगम

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार सिडको महामंडळात हिरकणी कक्ष उभारण्यात आला असून, स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत या कक्षाचे उद्घाटन सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. शान्तनु गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी डॉ. राजा दयानिधी, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको; श्री. गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको; श्री. सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, सिडको; तसेच विभाग प्रमुख, कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी आणि अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



हिरकणी कक्ष हा महिला कर्मचाऱ्यांच्या आरोग्य, सन्मान आणि कार्यक्षमता लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला विशेष कक्ष आहे. मातृत्व रजेनंतर कार्यालयात पुनरागमन करणाऱ्या महिलांसाठी हा कक्ष सुरक्षित, स्वच्छ आणि खाजगी वातावरण देतो. येथे स्तनपानासाठी स्वतंत्र व आरामदायी जागा, बाळासाठी पाळणा, खेळणी, स्वच्छ पिण्याचे पाणी, विश्रांतीसाठी आरामदायी आसनव्यवस्था, पंखा, वातानुकूलन, तसेच आवश्यक स्वच्छताविषयक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या उपक्रमाचा उद्देश महिलांना त्यांच्या मातृत्वाच्या काळात मानसिक आणि शारीरिक आराम मिळवून देणे, तसेच कार्यस्थळी त्यांचा आत्मविश्वास वाढवणे हा आहे. महिला कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी हा कक्ष कार्यस्थळी मातृत्वास अनुकूल वातावरण निर्माण करतो. याचबरोबर सर्व महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि त्या अनुषंगिक गरजांचा विचार करून हा कक्ष सुसज्ज करण्यात आला आहे.

‘हिरकणी’ हे नाव रायगड किल्ल्यावरच्या एका धाडसी महिलेकडून आले आहे. हिरकणी ही गवळण आपल्या बाळाची काळजी घेण्यासाठी संध्याकाळच्या तोफेनंतरही किल्ल्याच्या तटबंदीतून खाली उतरून आणि प्राणाची पर्वा न करता घरी पोहोचली होती. मातृत्वाच्या प्रेमासाठी आणि निर्धारासाठी ओळखल्या जाणाऱ्या या कथेनं महिलांच्या चिकाटीचं प्रतिक निर्माण केलं. याच प्रेरणेवरून या कक्षाला ‘हिरकणी कक्ष’ असे नाव देण्यात आले आहे. सिडकोतर्फे राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिक सुरक्षित, सुलभ आणि सन्माननीय कार्यपरिसर मिळणार असून, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने सिडकोची बांधिलकी अधिक बळकट होणार आहे.

# सिडकोच्या पूर्वाश्रमीच्या बीएमटीसी बस सेवेतील बेरोजगार झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्काळ आर्थिक मोबदला द्यावा : आ.विक्रांत पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडको कार्यकक्षेत पूर्वी कार्यरत असणाऱ्या बीएमटीसी बस सेवेतील काम करणारे ड्रायव्हर, कंडक्टर, मेंटनन्स कर्मचारी इत्यादी कर्मचारी वर्ग बस सेवा बंद केल्याने सन १९८४ पासून बेरोजगार झाले. ही बस सेवा पुन्हा सुरू व्हावी किंवा या कर्मचाऱ्यांना अन्य कामात सामावून घ्यावे किंवा या सर्व कर्मचाऱ्यांना योग्य तो आर्थिक मोबदला द्यावा यासाठी हे कर्मचारी अविरतपणे संघर्ष करीत आहेत.या कर्मचाऱ्यांच्या ४२ वर्ष प्रलंबीत मागाण्यांसाठी आ. विक्रांत पाटील यांच्या नेतृत्वात सिडको चे व्यवस्थापकीय सह संचालक श्रीं गणेश देशमुख यांच्या दा-लनात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.




अनेक कामगार संघटना व नेते यांनी या विषयात पाठपुरावा केला होता, परंतु अजूनही कोणतीही ठोस कार्यवाही झा-लेली नाही. या सर्व कर्मचाऱ्यांना योग्य तो आर्थिक मोबदला मिळावा यासाठी आ. विक्रांत पाटील वेळोवेळी सिडको प्रशासनाशी चर्चा करीत आहेत. यापूर्वी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या पाठपुराव्यामुळे सुमारे ६३१ कर्मचाऱ्यांना झक्र व ग्रॅच्युइटी मिळाली देण्यात आली होती. आता हे सर्व ६३१ कर्मचारी तसेच सर्वच १५८७ कर्मचाऱ्यांना रुपये १० लाख इतका आर्थिक मोबदला तात्काळ दिला जावा ही मागणी आ. विक्रांत पाटील यांनी लावून धरली आहे. अनेक वर्षांपासून हा विषय प्रलंबित असेल्याने आता हा आर्थिक मोबदला देताना पुराव्या करिता कमीत कमी कागदपत्र घ्यावी व कोणत्याही जाचक अटी लावू नयेत अशी मागणी ही आ. विक्रांत पाटील यांनी केली आहे. या बैठकीत अतिशय सकारात्मक चर्चा झाली असून सिडको व्यवस्थापकीय सह संचालक गणेश देशमुख यांनी या पूर्व कर्मचाऱ्यांना १० लाखाचा आर्थिक मोबदला देण्याकरिता तात्काळ ठोस कार्यवाही करण्यात येईल असे आश्वस्त केले.

# नागरिकांना विहित वेळेत आणि सुरळीत डिजिटल सेवा द्या : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । रायगड**

आधार कार्ड नोंदणी आणि प्रमाणिकरण प्रक्रियेला गती देण्यासाठी शासनाने आधारसंच उपलब्ध करून दिले आहे. तरी या सर्व संच धारकांनी वेळेत आणि सुरळीत नागरिकांना सुविधा दयाव्यात अशा सूचना महिला व बालविकास मंत्री कु आदिती तटकरे यांनी दिल्या. नियोजन भवन येथे महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांच्या हस्ते रायगड जिल्ह्यासाठी प्राप्त नवीन आधार संचाचे वाटप करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपवनसंरक्षक राहुल पाटील, उपजिल्हाधिकारी डॉ रविंद्र शेळके उपस्थित होते. जिल्ह्यात ७१ संचचे वाटप यावेळी करण्यात आले.



यावेळी मार्गदर्शन करताना कु. तटकरे म्हणाल्या, आधार कार्ड आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात खूप महत्त्वाचे कागदपत्र आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्या-तील नागरिकांना ही सेवा वेळेत आणि सुरळीत मिळण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील होते. माहिती व तंत्रज्ञान विभागाने उप-लब्ध करून दिलेल्या या किटमुळे महान-गरी भागांपासून अगदी दुर्गम गावांपर्यंत प्रत्येक नागरिकाला आधार नोंदणी आणि अद्ययावत सेवा सहज मिळणार आहेत. या सर्व आधार संस्थाचालकांनी नियमाचे पालन करून सेवा उपलब्ध करून द्याव्यात असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आधार प्रामाणिकरण सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन करीत असलेल्या उपाययोजनाबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपजिल्हाधिकारी डॉ रविंद्र शेळके यांनी केले.

रायगड जिल्हा माहिती कार्यालयाची निर्मिती असलेल्या महाड चवदार तळे सत्याग्रहावर आधारित कॉफी टेबल बुकचे महिला व बालविकास मंत्री कु आदिती तटकरे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील प्रमुख ऐतिहासिक घटना, स्थळे सर्व तरुणांईपर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाने समाज माध्यमातून प्रसिद्धी करावी तसेच या पुस्तकाची ई आवृत्ती तयार करावी अशा सूचना कु. तटकरे यांनी दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपवनसंरक्षक राहुल पाटील, उपजिल्हाधिकारी डॉ रविंद्र शेळके, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# माथेरानमध्ये भारताचा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७८ वा वर्धापनदिन ग्रामस्थांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. सकाळी पावणेआठ वाजता मुस्लिम मोहल्ला येथे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते जहुर चिपाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर संत रोहिदास महाराज नगर येथे चर्मकार समाजाचे माजी अध्यक्ष गजानन अबनावे यांच्या हस्ते, श्रीराम चौकात उद्योजिका विनिता गुप्ता यांच्या हस्ते, प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक दिलीप अहिरे, अधीक्षक कार्यालयात अधीक्षक सुरेंद्र ठाकूर यांच्या हस्ते, नगरपरिषदेच्या कार्यालयासमोर नायब तहसीलदार सचिन राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.असेंब्ली हॉल येथे नगरपालिका अधीक्षक सदानंद इंगळे यांच्या हस्ते, हुतात्मा भाई कोतवाल यांच्या घरासमोर मेघा कोतवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला रचना सहायक करुणा बांगर यांच्या हस्ते पुष्पहार, वीर हुतात्मा भाई कोतवाल यांच्या अर्ध पुतळ्याला लेखापाल भारत पाटील यांच्या हस्ते पुष्पहार, स्वातंत्र्य सैनिकांच्या स्तंभास कर निर्धारण अधिकारी समीर दळवी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.हुतात्मा स्मारक येथे डॉ. रुपाली मिसाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्मारकातील हुतात्म्यांच्या प्रतिमेस परिचारिका स्नेहा गोळे,नामफलकास सफाई कामगार लक्ष्मण दरवडा, वीर हुतात्मा भाई कोतवाल आणि वीर हुतात्मा हिराजी पाटील यांच्या शिल्पास स्नेहा साखळकर आणि कांती पुरबिया यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

# पनवेल महानगरपालिका

## मालमत्ता कर विभाग

अभय योजना

**केवळ एक वेळची विशेष व अंतिम बाब, करदात्यांसाठी सुवर्णसंधी !!!**

# अभय योजने अंतर्गत शास्ती माफीला मुदतवाढ

## मालमत्ता कर एकरकमी भरा व शास्तीवर सवलत मिळवा !

**१६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत शास्ती मध्ये ९०% सवलत.**

**१६ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत शास्ती मध्ये ७५% सवलत.**

पनवेल महानगरपालिकच्या panvelmc.org या संकेतस्थळावर जाऊन नागरीक आता मालमत्ता कराच्या विविध सेवाकरीता "पीएमसी कर मित्र" या प्रणालीचा वापर करू शकतात.
मालमत्ता कराचा भरणा, तक्रारी, अभिप्राय व सुचना "पीएमसी कर मित्र" या चॅटबॉट च्या माध्यमातून नोंदविता येतील.
नागरिकांनी आता मालमत्ता कराच्या विविध सेवाकरीता रांगेत उभे न राहता ऑनलाईन स्वरूपात "पीएमसी कर मित्र" या प्रणालीचा वापर करावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्री. मंगेश चितळे यांनी केले आहे.

**चालू वर्ष २०२५-२६ करिता ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत कराचा संपूर्ण भरणा करा, ५% सूट हमखास मिळवा.**

**E-Bill स्वीकारा, डिजिटल भरणा करा वेळ वाचवा, २% सूट घेऊन बचत वाढवा!**

ऊर्जा बचत करा सौर शक्तीने, आणि करामध्ये घ्या २% सूट!

जल पुन:भरणाचा अवलंब करा, २% सूट सहज मिळवा!

घनकचरा शास्त्रोक्त पद्धतीने हाताळा, सवलतीचं दार उघडा आणि करात २% सूट मिळवा!

कचऱ्याची शिस्तबद्ध विल्हेवाट करा, मिळवा २% करामध्ये सवलत हमखास!

डिजिटल युगात स्मार्ट निर्णय पारंपरिक रांगा सोडा, PMC Tax App & Panvel Connect App वरून घरबसल्या कर भरा!

वेळ वाचवा, panvelmc.org वरून कर ऑनलाईन भरा आणि मालमत्ता करामध्ये सवलती मिळावा.

**मंगेश चितळे**
आयुक्त तथा प्रशासक,
**पनवेल महानगरपालिका**
स्वामी नित्यानंद रोड, गोखले हॉल जवळ पनवेल - 410206